# मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ
## कार्यकारी अभियंता/सी-१ विभाग/मुं.इ.दु.वुप.मंडळ यांचे कार्यालय
## अे-६६, ए दादरकर कंम्पाऊंड, ताडदेव, मुंबई-४०० ०३४

म्हाडा MHADA

---

**स्मरणपत्र क्र. ०१**

जा.क्र.का.अ./सी-१/दुवपु/ 1332 /२०२६
दिनांक- 18/02/2026

प्रति,

सर्व भाडेकरु/रहिवाशी
इमारत क्र. २३-२७, बनियान स्ट्रीट, मुंबई-०३

मालक- मे. राजस्थान टेडर्स,
३०४, अब्दुल रेहमान स्ट्रीट, मुंबई-४००००३

विषय- उपकर प्राप्त इमारत क्र. २३-२७, बनियान स्ट्रीट, मुंबई-०३ च्या धोकादायक संरचनात्मक स्थितीबाबत इशारा सूचना (उपकर क्र. सी-६२९३)

संदर्भ:- १) मे. स्ट्रक्टेरा इंजिनियरींग एलएलपी यांनी या कार्यालयास दि. २८.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेला संरचनात्मक परिक्षण अहवाल.
२) या कार्यालयाची धोक्याची सुचना क्र. ३१३४ दिनांक. ०२.०६.२०२५

महोदय/महोदया,

या कार्यालयातर्फे विषयांकित इमारतीचे मे. स्ट्रक्टेरा इंजिनियरींग एलएलपी यांनी संरचनात्मक परिक्षण केले आहे. त्या अनुषंगाने मे. स्ट्रक्टेरा इंजिनियरींग एलएलपी यांनी संदर्भाधिन पत्रान्वये संरचनात्मक परिक्षण अहवाल या कार्यालयास सादर केला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने विषयांकित इमारतीची वर्गवारी C-१ म्हणजेच To be demolished अशी नमूद करण्यात आली आहे. त्यामुळे संदर्भ क्र. ०२ अन्वये आपणास यापूर्वीच धोक्याची सूचना दिलेली असून इमारत रिक्त करण्याबाबत कळविले आहे. विषयांकित इमारतीची दिनांक.१६.१२.२०२५ रोजी प्रत्यक्ष स्थळपाहणी केली असता, इमारत धोकादायक असल्याची या कार्यालयामार्फत निश्चिती झाली असून इमारतीमध्ये वास्तव्य करणे. धोकादायक असल्यामुळे, म्हाड अधिनियम १९७६ मधिल कलम ७७(ब) अन्वये आपणास सूचित करण्यात येते की, विषयांकित इमारतीत वास्तव्य करणे धोकादायक असून आपण आपली सदनिका तातडीने रिक्त करुन इमारत निष्कासित करावी. आपणास पर्यायी निवासस्थानासाठी म्हाडाच्या संक्रमण शिबिरातील गाळयाची आवश्यकता असल्यास आपण या कार्यालयास खालील नमूद कागदपत्रांच्या मूळ प्रती व त्यांच्या छायांकित प्रतींचे दोन संच तसेच सोबत आपली पासपोर्ट आकाराची ०८ छायाचित्रे या कार्यालयास सादर करावीत, जेणेकरुन आपणास संक्रमण शिबिरातील गाळा उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यक ती प्रक्रिया सुरु करणे या कार्यालयास शक्य होईल.

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशिल | शेरा |
|---|---|---|
| १ | भाडेपावती – दि. १३.०६.१९९६ पुर्वीची व सध्याची | सदर कागदपत्रे विषयांकित इमारतीत आपण वास्तव्यास असलेल्या गाळयाशी संबंधित असणे आवश्यक आहे. |
| २ | शिधापत्रिका – दि. १३.०६.१९९६ पुर्वीचे | |
| ३ | निवडणूक ओळखपत्र – दि. १३.०६.१९९६ पुर्वीचे | |
| ४ | विद्यूत देयक – दि. १३.०६.१९९६ पुर्वीचे व सध्याचे | |
| ५ | दुरध्वनी देयक – दि. १३.०६.१९९६ पुर्वीचे व सध्याचे | |
| ६ | आधार कार्ड व पॅनकार्ड | |
| ७ | पारपत्र/वाहन चालक परवाना, इत्यादी. | |
| ८ | इमारतीतील वास्तव्याबाबतचे इतर पुरावे | |

उपरोल्लेखित बाबींची पुर्तता करुन आपण आपला गाळा निष्कासित करुन इतरत्र स्थलांतरीत झाला नाहीत व इमारतीत आपले वास्तव्य सुरु ठेवलेत आणि त्या कालावधीत इमारतीत पडझडीने अपघात घडून जीवित अथवा वित्त हानी झाल्यास, त्यास सर्वस्वी आपण जबाबदार रहाल याची आपण गांभिर्याने नोंद घ्यावी.

वरील पर्यायाप्रमाणे (अ, ब आणि क) आपण स्थलांतरीत झाला नाहीत व इमारतीत वास्तव्यास राहण्याचे सुरुच ठेवले त्यानंतर भविष्यात अपघात घडून काही वित्त व जीवित हानी झाल्यास त्यास मुं. इ. दु व पु. मंडळ जबाबदार राहणार नाही व याबाबत सर्वस्वी आपणांस जबाबदार धरण्यात येईल तसेच आपण आपल्या स्वत:च्या जबाबदारी (Risk & Cost) वर इमारतीत वास्तव्य करीत आहात याची कृपया **गांभिर्याने** नोंद घ्यावी.

सबब सदरहू इमारतीतील गाळा/खोली लवकरात लवकर रिक्त करुन वरीलप्रमाणे संक्रमण शिबीरात गाळा मिळणेकामी उपरोक्त कोष्टकातील नमूद कागदपत्रे सादर करण्याबाबतची कार्यवाही अथवा आपल्या स्तरावर पर्यायी वास्तव्य व्यवस्था करावी अन्यथा सुरक्षतितेच्या दृष्टीकोनातुन इमारतीचा पाणी पुरवठा व विद्युत पुरवठा खंडित करुन **इमारतीच्या निष्कासनाची कार्यवाही या कार्यालयामार्फत सुरु करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.**

| | |
|---|---|
| टीप:- | **१) संबधित सदनिकेच्या भाडेकरु/रहिवासाचे हक्क कागदपत्र पडताळणीच्या अधिन असून सदरचे पत्र आपणास भाडेकरु/रहिवाशी हक्काचा दाखला म्हणून वापरता येणार नाही, याची आपण नोंद घ्यावी.**<br>**२) पर्यायी निवासस्थानापोटी म्हाडाचे संक्रमण शिबीरातील गाळे अथवा मासिक भाडे या बाबी केवळ उपकरप्राप्त इमारतीतील निवासी गाळयांस लागु आहेत, याची आपण नोंद घ्यावी** |

सदर बाब तातडीची समजावी.

आपला विश्वासू,

**कार्यकारी अभियंता/सी- विभाग,**
**मुं.इ.दु.व पु. मंडळ, मुंबई.**

प्रत-

- मा. मुख्य अधिकारी/मुं.इ.दु.व पु.मं. यांना माहितीस्तव सविनय सादर.
- मा. उपमुख्य अभियंता (परिमंडळ-०१)/मुं.इ.दु.व पु.मं. यांना माहितीस्तव सविनय सादर.
- उपमुख्य अधिकारी (सं.गा)/ मुं.इ.दु.व पु.मं. यांस माहितीस्तव सस्नेह अग्रेषित.
- मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी/प्राधिकरण यांस माहितीस्तव तथा म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेकामी रवाना.
- सहाय्यक आयुक्त, सी-विभाग, मनपा, यांस माहितीस्तव सस्नेह अग्रेषित.
- वरिष्ठ पोलिस निरिक्षक, पायधुनी पोलिस ठाणे यांस माहितीस्तव रवाना.
- वरिष्ठ अग्निशमन अधिकारी, भायखळा अग्निशमन केंद्र यांस माहितीस्तव रवाना.
- इमारतीच्या दर्शनी भागावर चिकटविणेसाठी.
    - इमारतीच्या घरमालकाची नोंद या कार्यालयात उपलब्ध असलेल्या अभिलेखाच्या अनुषंगाने नमूद करण्यात आलेली आहे. तथापि नोंदीव्यतिरिक्त इमारतींच्या मालकीचे अन्य असल्यास त्यांनी व इमारतीच्या सर्व भाडेकरु/रहिवाशी यांनी सदर धोक्याच्या सूचनेची दखल घेणेकामी या नोटीशीच्या प्रती पंचनाम्यासहित इमारतीच्या दर्शनी भागावर चिकटविण्यात येत आहेत.